# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, ४९, खेरवाडी,
अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.
दूरध्वनी/फॅक्स : २६४७ ४८ ९२ , २६४७ १६ १९
ई-मेल – jtdirrom@gmail.com Website -:http://www.jdteromumbai.com


**अतितात्काळ/अतिमहत्वाचे/ई-मेलव्दारे**

क्रमांक : २/विकामु/तंशि/आस्था(३)/२०१२/ 3365
दिनांक : 15 OCT 2012

प्रति,
प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित
पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय :- सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत व शालार्थ प्रणाली लागू करण्याबाबत करावयाची कार्यवाही.
संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण म.रा. मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/रिक्त पदे/२०१२/१३६ दि.१५.१०.२०१२

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संचालक, तंत्रशिक्षण म.रा. मुंबई यांनी संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार शासन निर्णयानुसार रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्याबाबतचे निर्देश शासनाकडून प्राप्त झालेले आहेत.

त्या अनुषंगाने आपल्या संस्थेतील रिक्त असलेली पदे कोणत्याही परिस्थितीत २ महिन्याच्या कालावधीत भरण्याबाबतची कार्यवाही पुर्ण करण्यात यावी असे निर्देश प्राप्त झालेले आहेत. तरी सदर निर्देशानुसार आपल्या संस्थेतील रिक्त पदे २ महिन्याचे कालावधीत भरण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

ज्या संस्था २ महिन्याच्या विहित मुदतीत सर्व संवर्गातील रिक्त पदे १००% भरणार नाहीत अशा अनुदानित संस्थांचे अनुदान थांबविण्यात येईल याची नोंद घ्यावी असे निर्देश शासनाकडून प्राप्त झालेले आहेत.

तरी त्यानुसार आपल्या संस्थेतील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. तसेच २ महिन्याच्या कालावधीत रिक्त पदे भरण्यात आली नाहीत तर त्याबाबत संस्थाप्रमुखांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(सु.तं. सोनार)
**प्रशासकीय अधिकारी**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

प्रत :- संचालक, तंत्रशिक्षण म. रा. मुंबई यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने माहितीकरिता.

**महाराष्ट्र शासन**

**कृपया तात्काळ**
**समय मर्यादा**

क्रमांक: संकीर्ण-२०१२/स.प्र.१३१६/१२/तांशि-७
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ११ऑक्टोबर, २०१२

प्रति,
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई- ४०० ००१

**विषय : सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत व ज्ञानार्थ प्रणाली लागू करण्याबाबत करावयाची कार्यवाही.**

महोदय,

उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेली पदे भरण्याबाबत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा आढावा वेळोवेळी मा. मुख्य सचिव तसेच मा. मंत्री महोदयांच्या स्तरावर घेण्यात येत आहे. या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व संवर्गातील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्याबाबत आपणास वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. आपल्या कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार सद्य:स्थितीत तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय संस्थामधील गट-अ व गट-ब ची एकूण १६६५ पदे रिक्त असून अनुदानीत संस्थामधील ५१४ पदे अशी एकूण २१७९ पदे रिक्त आहेत. मंजूर पदसंख्येच्या प्रमाणात रिक्त असलेल्या या पदांची टक्केवारी अनुक्रमे ४८.४७ % व ५०.३१ % इतकी आहे. रिक्त पदांचे हे प्रमाण निश्चितच योग्य नाही.

०२. रिक्त पदे भरण्याबाबत दि. ०९/१०/२०१२ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर आढावा घेण्यात आला. तसेच, दि. ०९/१०/२०१२ रोजी रिक्त पदांबाबत लोकलेखा समितीपुढे मा. अप्पर मुख्य सचिव यांची साक्ष झाली. विभागांतर्गत मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या पदांबाबत मंत्रीमंडळाने आणि लोकलेखा समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच, याबाबत मा. मुख्य सचिव यांच्या स्तरावर झालेल्या बैठकीदरम्यान मा. मुख्य सचिव यांनी देखील विभागांतर्गत मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या पदांबाबत नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर मा. अप्पर मुख्य सचिव यांनी दि. १०/१०/२०१२ रोजी विभागातील सर्व अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन रिक्त पदे भरण्याबाबत गांभीर्याने व विहित मुदतीत कार्यवाही करण्याचे आदेशीत केले आहे. सदर बैठकीमध्ये मा. अप्पर मुख्य सचिव यांनी खालील प्रमाणे सुचना दिल्या आहेत —

१) विभागांतर्गतची सर्व रिक्त पदं कोणत्याही परिस्थितीत २ महिन्यांच्या कालावधीत भरण्यात यावी अन्यथा याबाबत क्षेत्रीय स्तरावर संबंधित संचालकांना जबाबदार धरण्यात येईल.
२) अनुदानित संस्थांमधील सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत देखील २ महिन्यांच्या कालावधीत संबधित संस्थांनी कार्यवाही पूर्ण करावयाची आहे. सदर कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण होईल याची खबरदारी क्षेत्रीय स्तरावर संबंधित संचालकांनी घ्यावयाची आहे.

http://192.168.1.1/webmail/mailAttach/002.jpg?part=0.2&folder=%7Edesk4a%40dte.org.... 10/11/201

३) ज्या अनुदानीत संस्था २ महिन्यांच्या विहीत मुदतीत सर्व संवर्गातील रिक्त पदे १०० टक्के भरणार नाहीत अशा अनुदानीत संस्थांचे अनुदान थांबविण्यात येईल, ही बाब देखील संबंधित अनुदानीत संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

४) सरळ सेवेने भरावयाच्या सर्व पदांबाबतचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास **दि. २१ ऑक्टोबर, २०१२** पर्यंत पाठविण्यात यावे.

५) जी पदे मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय पदोन्नती समितीच्या मान्यतेने भरावयाची आहेत अशा सर्व पदांच्या पदोन्नतीचे परिपूर्ण प्रस्ताव **दि. २१ ऑक्टोबर, २०१२** रोजी होणा-या विभागीय पदोन्नती समितीसमोर सादर करण्यात यावेत.

६) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या तथापि अद्यापर्यंत रुजू न झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या पदावर रुजू करून घेण्याची कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करून तात्काळ करण्यात यावी.

७) वरील प्रमाणे रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी संचालनालयातील संबंधित सहसंचालक / उप संचालक यांना जबाबदारी नेमून देण्यात यावी.

८) रिक्त पदे भरण्याबाबत विभागांतर्गतच्या सर्व संचालकांची आढावा बैठक ऑक्टोबर महिन्याच्या दुस-या आठवड्यात मा. अप्पर मुख्य सचिव घेणार आहेत.

९) १०० टक्के शासकीय कर्मचा-यांचे पगार सेवार्थ मार्फतच करण्यात यावेत व ते तसे होत आहेत हे संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रमाणीत करुन दि. १९/१०/२०१२ पर्यंत शासनास कळवावे.

१०) संचालनालयातर्गतच्या सर्व आहरण व संवितरण अधिका-यांची नावे व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कर्मचा-यांची नावे याबाबतची अचूक यादी तात्काळ तयार करण्यात यावी.

११) शालार्थ प्रणाली **मुंबई, ठाणे, पुणे व लातूर** या ४ जिल्ह्यांमध्ये पहिल्या टप्प्यात लागू करावयाची असून यासाठी संबंधित विभागाचे सह संचालक, यांचेवर जबाबदारी सोपवून संचालनालयातील उप संचालक दर्जाच्या अधिका-यांनी दैनंदिन पाठपुरावा करावा व श्री. अधिवेद, M/s Accenture व TCS चे प्रतिनिधी यांच्या मदतीने शालार्थ या प्रणालीमध्ये आवश्यक ते बदल करुन घेण्याची कार्यवाही संचालकांनी करावी. सदर कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत **दि. ३१/१०/२०१२** पूर्वी पूर्ण करण्यात यावी तसेच, इतर जिल्ह्यांबाबत देखील संचालकांनी त्वरीत कार्यवाही करावी. या संदर्भात मा. अप्पर मुख्य सचिव यांच्याकडे दि. १५/१०/२०१२ रोजी दु. ३.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली असून सदर बैठकीस आपण स्वत: , संचालनालयातील संबंधित उप संचालक व प्रणाली विश्लेषक यांच्यासह उपस्थित रहावे.

**सबब**, उक्त वस्तुस्थिती विचारात घेता तंत्रशिक्षण संचालनालयातर्गतची रिक्त पदे भरण्याबाबतची तसेच शालार्थ प्रणाली लागू करण्याबाबतची कार्यवाही सर्व प्राधान्याने करण्यात येऊन विहीत मुदतीत पूर्ण होईल, असे कृपया पहावे.

आपला,

(डॉ. अभय वाघ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

[illegible]